Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# लिंगभेद आणि महिला सबलीकरण : एक आर्थिक अध्ययन

**प्रा. डॉ. अमोल गिरिधरराव आवंडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
नूतन आदर्श कला,वाणिज्य व श्रीमती एम.एच. वेगड विज्ञान महाविद्यालय उमरेड जिल्हा - नागपूर.

---

***सारांश :***

*भारतात आणि संपूर्ण जगात सुद्धा लिंगभेदाची समस्या सर्वव्यापक दिसते. लिंगभेदाच्या समस्येमुळे स्त्रियांना आपलं स्वातंत्र्य पूर्णता उपभोक्ता येत नाही.भारतासह संपूर्ण जगातच पुरुषप्रधान संस्कृती असल्याने महिला मात्र तुलनेने मागे राहिलेल्या दिसतात. चूल आणि मूल हे तर भारतातील संस्कृतीचाच भाग झालेला आहे परंतु आधुनिक काळात मात्र या परिस्थितीत बदल होतांना दिसते.भारताला विकसित देश म्हणून जगात नाव रूपाने यायचे असल्यास स्त्रियांना देखील मोठ्या प्रमाणात विकासाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून त्यांच्या शक्तीचा वापर करून व त्यांना त्यांचे अधिकार देऊन त्यांना पूर्ण स्वतंत्रता प्रधान करणे हेच खरे महिला सबलीकरण आहे.भारतीय स्त्रीला लिंगभेदाच्या खाईतून बाहेर काढून महिला सबलीकरणावर विशेष भर देणे आवश्यक आहे.आज संपूर्ण जगात खास करून विकसित देशात मोठ्या प्रमाणात स्त्रीशक्ती समोर येत आहे म्हणून भारतात देखील स्त्रियांनी विकासाच्या या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपले अस्तित्व निर्माण करून आपल्या अधिकारांना प्राप्त करून आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन या सर्व बाबी घडवून आणणे व त्याच्या माध्यमातून स्वतःचा विकास करणे हेच ध्येय ठेवले पाहिजे. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंध अध्ययनाकरिता घेण्यात आलेला विषय हा लिंगभेद व महिला सबलीकरणावर आधारित आहे.या शोध निबंधाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत. भारतातील महिलांवर लिंगभेदाचा होणारा परिणाम अभ्यासणे,महिलांना आर्थिक विकासात समाविष्ट करण्याकरिता आवश्यक बाबींचे अध्ययन करणे, भारतातील महिलांवर महिला सबलीकरण धोरणाचा झालेला परिणाम अभ्यासणे, भारतीय समाजात पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या योगदानाचे अध्ययन करणे, भारतातील ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे. प्रस्तुत शोध निबंधाचा विषय "लिंगभेद आणि महिला सबलीकरण :- एक आर्थिक अध्ययन."असा असून या शोध निबंधाच्या अध्ययनाच्या माध्यमातून पुढील गृहीतके घेऊन त्यांचे परीक्षण करण्यात आले आहे ही गृहितके पुढील प्रमाणे आहेत. भारतातील श्रम विभागणी ही लिंगभेदावर आधारित आहे,भारतात विविध क्षेत्रातील कार्यकारी महिलांचे आर्थिक शोषण होत आहे,भारतीय महिलांवर महिला सबलीकरण धोरणाचा अनुकूल परिणाम झाला आहे,भारतीय समाज व्यवस्था महिलांच्या आर्थिक विकासात व्यत्यय निर्माण करते.प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनाद्वारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास आले की वरील सर्व गृहीतके सत्य व अनुकूल आहेत त्यामुळे वरील सर्व गृहीतकांचा स्वीकार करण्यात आला आहे.*

---

**प्रस्तावना :**

कुटुंब किंवा परिवारामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांना किंवा काम करण्याच्या ठिकाणी स्त्रियांना पुरुषांपेक्षा लिंग भेदाच्या समस्येला संपूर्ण जगात सामोरे जावे लागते. लिंगभेद म्हणजे स्त्री आणि पुरुष यांना समान न मानणे किंवा केवळ स्त्री आहे म्हणून स्त्रीला पुरुषांपेक्षा निम्न दर्जाची वागणूक दिली जाते किंवा विविध अधिकारांपासून त्यांना वंचित ठेवल्या जाते म्हणजेच केवळ स्त्री म्हणून जन्म झाल्यामुळे स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखणे किंवा त्यांना विविध क्षेत्रातील कामकाजांमध्ये किंवा परिवारामध्ये पुरुषासमान वागणूक किंवा अधिकार न मिळणे म्हणजेच लिंगभेद किंवा स्त्री पुरुष असमानता होय. आज जगात पितृसत्ताक कुटुंब पद्धती असल्याने हिंसेद्वारे किंवा मानसिक खच्चीकरण करून स्त्रियांवर पुरुषांद्वारे नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. कुटुंबातील किंवा घर परिवारातील कामे निरंतर स्त्रियांना करावी लागतात परंतु त्यांना या कामाबद्दल कोणताही आर्थिक मोबदला मिळत नाही परंतु जेव्हा हीच कामे पुरुषांद्वारे विविध ठिकाणी केली जात असतील उदाहरणार्थ हॉटेलमध्ये तर पुरुषांना मोबदला मिळते परंतु या ठिकाणी म्हणजेच हॉटेलमध्ये जर स्त्रिया कामाला लागल्या तर पुरुषांच्या तुलनेत त्यांना कमी मजुरी किंवा कमी वेतन दिले जाते या ठिकाणी देखील स्त्रियांमध्ये आणि पुरुषांमध्ये फरक केला जातो जरी स्त्रिया ही कामे पुरुषांपेक्षा अधिक चांगले व उच्च दर्जाचे करीत असली तरी तिला पुरुषांच्या तुलनेत कमी आर्थिक मोबदला मिळते. स्त्रियांना नेहमीच लिंगभेद किंवा स्त्री पुरुष असमानता या समस्येला सामोरे जावे लागते त्यामुळेच प्रस्तुत शोध निबंधाचा विषय **"लिंगभेद आणि महिला सबलीकरण :- एक आर्थिक अध्ययन."** हा घेण्यात आला आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून स्वतःच्या आर्थिक विकासामध्ये महिलांची भूमिका किंवा भारताच्या आर्थिक विकासामुळे महिला किंवा स्त्रियांची आर्थिक स्थिती तसेच स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी कोणते उपाय सुचवता येतील जेणेकरून भारताच्या आर्थिक विकासात स्त्रीशक्तीचे योगदान मोठ्या प्रमाणात लाभेल व स्त्रियांना देखील पुरुषांसमान वेतन व आर्थिक मोबदला मिळेल एवढेच नव्हे तर ती पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी स्त्रियांना देखील पुरुषांसमान वागणूक मिळणे आवश्यक आहे. भारतात महिला चूल आणि मूल या संस्कृतीत अजूनही वावरतांना दिसतात परंतु हे देखील सत्य आहे की भारत जसजसा विकसित होत आहे तसतसा स्त्रियांचा आर्थिक व्यवहारांमध्ये किंवा भारताच्या विकासामध्ये सहभाग वाढतांना दिसत आहे म्हणून आज आपल्याला विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्त्रीशक्ती काम करतांना दिसून येते.भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास हा सर्वसमावेशक व शाश्वत स्वरूपाचा होण्याकरिता स्त्रियांना देखील सोबत घेऊन मोठ्या प्रमाणात त्यांना संधी उपलब्ध करून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्री शक्तीचा समावेश होणे आवश्यक आहे जगात विकसित देशांच्या तुलनेत स्त्री शक्तीची भारतातील विविध क्षेत्रात असणारी संख्या कमी आहे ते वाढविण्याकरिता लिंगभेद ही समस्या दूर करून स्त्री सबलीकरणावर सरकारने व समाजाने विशेष लक्ष देणे महत्त्वपूर्ण आहे.

**संशोधन पद्धती:**

कोणत्याही शोधनिबंधाचे लिखाण करण्याकरिता संशोधन पद्धती कोणत्या स्वरूपाची घेण्यात आली आहे हे स्पष्ट करणे आवश्यक असते प्रस्तुत शोधनिबंधाकरिता द्वितीय स्वरूपाच्या माहितीचा किंवा द्वितीय समकांचा वापर करण्यात आला असून हा शोधनिबंध लिखाणाकरिता वर्णनात्मक किंवा विश्लेषण पद्धती वापरण्यात आली

आहे या शोधनिबंधाची विविध उद्दिष्टे व गृहिते पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येतील.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे** :

प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1. भारतीय महिलांवर जागतिकीकरणाच्या परिणामांचे अध्ययन करणे.
2. भारतातील महिलांवर लिंगभेदाचा होणारा परिणाम अभ्यासणे.
3. महिलांना आर्थिक विकासात समाविष्ट करण्याकरिता आवश्यक बाबींचे अध्ययन करणे.
4. भारतातील महिलांवर महिला सबलीकरण धोरणाचा झालेला परिणाम अभ्यासणे.
5. भारतीय समाजात पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या योगदानाचे अध्ययन करणे.
6. भारतातील ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

**शोधनिबंधाची गृहितके :**

प्रस्तुत शोधनिबंधाची गृहीतके पुढील प्रमाणे आहेत.

1. भारतातील श्रम विभागणी ही लिंगभेदावर आधारित आहे.
2. भारतात विविध क्षेत्रातील कार्यकारी महिलांचे आर्थिक शोषण होत आहे.
3. भारतीय महिलांवर महिला सबलीकरण धोरणाचा अनुकूल परिणाम झाला आहे.
4. भारतीय समाज व्यवस्था महिलांच्या आर्थिक विकासात व्यत्यय निर्माण करते.

**महिला सबलीकरण आणि वास्तविकता :**

पितृसत्ताक वर्चस्वामुळे प्राचीन काळापासून महिलांमध्ये भेदभाव केला जात आहे. जगात पुनरुत्पादक हक्क, कामगार, शिक्षण आणि आरोग्याशी संबंधित कायदे महिलांवर अत्याचार आणि शोषण करण्यासाठी अजूनही वापरले जात आहेत. समान हक्काचे कायदे असलेल्या देशातही कायदे असूनही वास्तविकता अशी आहे की पुरुषांना उच्च पातळीवरील आर्थिक व्यवस्थेमध्ये सहज प्रवेश घेता येतो शिवाय त्यांचे राजकारण आणि सांस्कृतिक जगतात फार मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व होते.ही असमानता दूर करण्यासाठी राजकीय अजेंडा घेण्याची इच्छा असणाऱ्यांवर अवलंबून आहे. ग्लोबल ग्रीन्सची दृष्टी, ग्लोबल ग्रीन ग्रीस सनद आणि विशेषतः सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी संरेखित करून: सर्व लोकांची समानता राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेदभावापासून मुक्तता मानवी प्रतिष्ठेचा हक्क सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि पर्यावरणीय क्षेत्रात समान सहभाग आणि त्यात सहभागी होण्याची क्षमता तसेच ह्या सर्व क्षेत्रांमध्ये निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत समान प्रतिनिधित्व आणि सहभाग सर्व लोकांना त्यांचे शिक्षण, आरोग्य, लैंगिक ओळख आणि पुनरुत्पादनाबद्दल माहिती देण्याचे अधिकार असावेत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याच्या पदांवर महिलांचे समान प्रतिनिधित्व समान मूल्याच्या कामासाठी समान वेतन महिलांनी केलेल्या मोबदला न मिळालेल्या मजुरीची ओळख प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष भेदभाव, छळ, भीती, हिंसा आणि गैरवर्तन यांपासून मुक्तता सर्व पॉलिसींमध्ये लिंग समान हक्कासाठी मुख्य प्रवाहात बंधनकारक कायदे करणे योग्य होईल.

**लिंग भेद व महिला सबलकरणासाठी आवश्यक बाबी :**

कायद्यात निहित पितृसत्ताच्या जुलमापासून मुक्ती,ज्या समाजात सर्व महिलांचे आवाज व दृष्टीकोन ऐकले जातात अशा समाजात महिलांच्या सहभागास येणारे अडथळे दूर करण्यासाठी राजकीय प्रक्रियेत बदल करण्याची सोय.पुरुष आणि स्त्रियांची संपूर्ण समानता प्राप्त करण्यासाठी समाजात आणि कुटुंबातील पुरुष आणि स्त्रियांच्या पारंपारिक भूमिकेत बदल. महिलांना किमान पुरुषांइतकीच कायदेशीर क्षमता आणि त्या क्षमता वापरण्याच्या समान संधी असल्याचे सुनिश्चित करणे.महिलांची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि पर्यावरणीय समानता सुनिश्चित करणे.

योग्य कायदेशीर आणि कायदेविषयक चौकट आणि महिलांवरील सर्व भेदभावास प्रतिबंधित उपायांचा अवलंब करणे. महिलांविरूद्ध भेदभावाच्या कोणत्याही कृतीत गुंतण्यापासून परावृत्त करणे आणि सार्वजनिक अधिकारी आणि सामाजिक संस्था या जबाबदाऱ्या अनुरुप कार्य करतात हे सुनिश्चित करणे.महिलांविरूद्ध भेदभाव निर्माण करणाऱ्या आणि या दृष्टीने संघर्ष निर्माण करणाऱ्या विविध शक्तींना आव्हान देण्यासाठी एक व्यापक संरचना उपलब्ध करणे.पुरुष आणि स्त्रियांमधील समानतेच्या उन्नतीसाठी समानता आणि न्यायावर आधारित नवीन आर्थिक व्यवस्था स्थापित करणे.सर्व प्रकारच्या वर्णद्वेषाचे, जातीय भेदभावाचे आणि स्त्रियांबद्दलची आक्रमकता दूर करणे.मातृत्वाचे सामाजिक महत्त्व आणि कुटुंबात आणि मुलांच्या संगोपनात दोन्ही पालकांच्या भूमिकेची ओळख.मुलांच्या संगोपनासाठी पुरुष, स्त्रिया आणि संपूर्ण समाज यांच्यात जबाबदारीचा वाटा आवश्यक आहे आणि त्याचा स्त्रियाच्या प्रजनन क्षमतेशी संबध ही भूमिका भेदभावाला आधार ठरणार नाही.

पुरुष आणि स्त्रियांमधील समानता शक्य होण्यासाठी पारंपारिक आधारभुत रचने मध्ये बदल.राजकीय हक्क राजकारण आणि सार्वजनिक जीवनात महिलांवरील भेदभाव दूर करणे.मतदानाच्या हक्कांची, सार्वजनिक पदाची आणि सार्वजनिक कार्ये करण्याची हमी.आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांना त्यांच्या देशांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी समान हक्कांची खात्री. देशाच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनाशी संबंधित संस्था आणि संघटनांमध्ये समान सहभागाची खात्री ज्या संस्था महिलांना उच्च स्तरीय पदांवर सहभाग वाढविण्यासाठी काम करत आहेत त्यांसाठी सहायता सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय प्रतिनिधित्त्व यासह जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांसाठी आवश्यक असल्यास कोटा लागू करणे.शासकीय धोरणे तयार करतांना व त्यांच्या अंमलबजावणीत महिलांचा सहभाग सुनिश्चित करणे.विविध स्थरावरील स्त्रियांसह व्यापक सल्लामसलतेच्या आधारे लैंगिक समानतेच्या दिशेने कृती व योजना विकसित करणे आणि सरकारच्या प्राथमिकतेत योजनेचे स्वरूप दिसून येईल याची खात्री करणे.राजकीय पक्ष आणि संसदेत महिलांच्या टक्केवारीचे लक्ष्य ठरविणे.सार्वजनिक सेवेत नोकरीसाठी व ऊच्च पदावर सामावून घेण्याकरिता टक्केवारीचे लक्ष्य ठरविणे.सर्व मुली आणि स्त्रियांना विनामूल्य शिक्षण करण्याची तरतूद करणे. शिक्षणाच्या क्षेत्रात पुरुषांशी समान हक्क मिळावेत यासाठी महिलांवरील भेदभाव दूर करणे.शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या लैंगिक आदरपूर्वक वृत्तीला प्रोत्साहन देणारी अभ्यासक्रमांची सामग्री,अध्यापनशास्त्रीय पद्धती आणि शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करणे.आयुष्याच्या सर्व टप्प्यावर महिलांच्या आरोग्याच्या समस्यांविषयी अचूक माहितीच्या तरतुदीसह, समुदाय -आधारित

महिलांची आरोग्य आणि लैंगिक आरोग्य सेवा वाढ़ करणे.मोफत आणि सुरक्षित गर्भधारणा, प्रसूती, बाळंतपण आणि बालपण सेवांची तरतूद करणे.घरगुती जन्म आणि दाई आधारित सेवांना आधार देण्यासाठी काळजीपूर्वक उपलब्धता व निवड करणे.सक्तीची नसबंदी बेकायदेशीर बनवून कायदे करणे आणि स्त्री जननेंद्रियाच्या विकृतीला प्रतिबंधित कायदे लागू करणे. विवाह आणि कौटुंबिक संबंध स्त्रियाना विवाहात स्वेच्छेने म्हणजे त्यांच्या पूर्ण संमतीने प्रवेश करता येणे आणि विवाहाच्या वेळी आणि विघटनानंतर समान हक्क आणि जबाबदारी मिळावी याची खात्री करुन घेणे.मुलांशी संबंधित विषयात वैवाहिक स्थिती विचारात घेता पालक म्हणून समान हक्क आणि जबाबदारी सुनिश्चित करणे; या सर्व प्रकरणांत मुलांचे हित सर्वोपरि असेल.पालकत्व, वॉर्डशिप, ट्रस्टीशिप आणि मुले दत्तक घेण्याबाबत समान अधिकार आणि जबाबदरी किंवा अशाच संस्था ज्या राष्ट्रीय संकल्पनेत अस्तित्वात आहेत त्याबाबत खात्री करणे; या सर्व प्रकरणांमध्ये मुलांचे हित सर्वोपरि असेल.कौटुंबिक नाव,व्यवसाय निवडण्याच्या अधिकारासह पती-पत्नी दोघांना समान वैयक्तिक अधिकार याची खात्री करणे. नागरिकत्व मिळवण्यासाठी, बदलण्यासाठी किंवा टिकवून ठेवण्यासाठी स्त्री-पुरुष दोघांना समान हक्कांची खात्री करणे.

**महिला आणि महिला कल्याणसंबंधी आराखडा :**

सर्व मुली आणि स्त्रियांना विनामूल्य शिक्षण करण्याची तरतूद करणे. शिक्षणाच्या क्षेत्रात पुरुषांशी समान हक्क मिळावेत यासाठी महिलांवरील भेदभाव दूर करणे.शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या लैंगिक आदरपूर्वक वृत्तीला प्रोत्साहन देणारी अभ्यासक्रमांची सामग्री, अध्यापनशास्त्रीय पद्धती आणि शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करणे. आयुष्याच्या सर्व टप्प्यावर महिलांच्या आरोग्याच्या समस्यांविषयी अचूक माहितीच्या तरतुदीसह, समुदाय-आधारित महिलांची आरोग्य आणि लैंगिक आरोग्य सेवा वाढ़ करणे.मोफत आणि सुरक्षित गर्भधारणा, प्रसूती, बाळंतपण आणि बालपण सेवांची तरतूद करणे. घरगुती जन्म आणि दाई आधारित सेवांना आधार देण्यासाठी काळजीपूर्वक उपलब्धता व निवड करणे.सक्तीची नसबंदी बेकायदेशीर बनवून कायदे करणे आणि स्त्री जननेंद्रियाच्या विकृतीला प्रतिबंधित कायदे लागू करणे.स्त्रियाना विवाहात स्वेच्छेने म्हणजे त्यांच्या पूर्ण संमतीने प्रवेश करता येणे आणि विवाहाच्या वेळी आणि विघटनानंतर समान हक्क आणि जबाबदारी मिळावी याची खात्री करुन घेणे.मुलांशी संबंधित विषयात वैवाहिक स्थिती विचारात घेता पालक म्हणून समान हक्क आणि जबाबदारी सुनिश्चित करणे; या सर्व प्रकरणांत मुलांचे हित सर्वोपरि असेल.पालकत्व, वॉर्डशिप, ट्रस्टीशिप आणि मुले दत्तक घेण्याबाबत समान अधिकार आणि जबाबदरी किंवा अशाच संस्था ज्या राष्ट्रीय संकल्पनेत अस्तित्वात आहेत त्याबाबत खात्री करणे; या सर्व प्रकरणांमध्ये मुलांचे हित सर्वोपरि असेल.

कौटुंबिक नाव, व्यवसाय निवडण्याच्या अधिकारासह पती-पत्नी दोघांना समान वैयक्तिक अधिकार याची खात्री करणे. नागरिकत्व मिळवण्यासाठी, बदलण्यासाठी किंवा टिकवून ठेवण्यासाठी स्त्री-पुरुष दोघांना समान हक्कांची खात्री करणे. लैंगिक आणि प्रजनन संदर्भातील आरोग्य-सर्व स्त्रियांना विनामूल्य गर्भनिरोधकांची सोय करणे. सर्व महिलांसाठी सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपात उपलब्ध करणे.लैंगिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम आणि कुटुंब नियोजन सेवा निधी उपलब्ध करणे. गर्भपात करण्याच्या अधिकाराचे रक्षण. गर्भपात ठरविण्याच्या कायद्याला समर्थन आणि गर्भधारणा संपवण्याचे सर्व पर्याय उपलब्ध आहेत याची खात्री

करणे. गर्भधारणा सुरू ठेवण्याचे स्वातंत्र्य संरक्षित करणे. हिंसा आणि महिला सुरक्षा लैंगिक आणि लिंग-आधारित हिंसापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी कायदे मजबूत करणे आणि हिंसाचार आणि छळ करण्याच्या कायद्याची अंमलबजावणी सुनिश्चित करणे घरगुती आणि कौटुंबिक हिंसा कमी करण्यासाठी आणि प्रभावी कायदे.लैंगिक अत्याचाराच्या बळी पडलेल्या सर्व पीडितांच्या गरजांबाबत न्याय व्यवस्था संवेदनशील आहे याची खात्री करुन घेणे.शालेय मुले व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष देऊन लिंग-संवेदनशीलता प्रशिक्षण आणि कार्यक्रम प्रदान करणे.महिला सशक्तीकरण आणि लिंग संवेदनशील धोरणे आणि कार्यक्रम यांच्यातील समन्वयाची खात्री करणे.रोजगाराच्या क्षेत्रात महिलांवरील भेदभाव दूर करणे.महिलांना समान कामासाठी समान वेतनाचे तत्व याची खात्री करणे.सर्व मानवांचा अविभाज्य हक्क म्हणून काम करण्याचा अधिकार मिळण्याची खात्री करणे.महिलांची होणारी तस्करी आणि लैंगिक कामगारांचे शोषण रोखण्यासाठी कायद्यासह सर्व योग्य उपाययोजना करणे, बहुतेक महिला नागरी कायद्यानुसार लैंगिक कार्याचे कायदेशीर समर्थन आणि नियमन केले जाणे.आदिवासी महिलांसह सामाजिक, पर्यावरणीय आणि आर्थिक मुद्द्यांवरील त्यांचे नेतृत्व ओळखण्यास आणि समर्थन देण्यासाठी कार्य करणे आणि स्थानिक आणि गैर-आदिवासी महिलांमधील विद्यमान सामाजिक आणि आर्थिक असमानता कमी करण्यासाठी कार्यक्रम आणि धोरणे लागू करणे.सर्व आरोग्य, शिक्षण आणि इतर सरकारी धोरणे आदिवासी महिलांचे कल्याण अबाधित ठेवण्यासाठी असल्याची खात्री करणे.ग्रामीण भागातील महिलांसाठी कायदेशीर संरक्षणाचा अर्ज सुनिश्चित करणे.ग्रामीण भागातील महिलांमधील भेदभाव नष्ट करून ग्रामीण विकास कार्यक्रमात त्यांचा सहभाग आणि प्रगती साठी उपाय योजना करणे.महिलांच्या आदरणीय प्रतिमेचे आणि त्यांच्या सशक्तीकरता फॅशन उद्योगासह जाहिरातीत,चित्रपटात आणि इतर माध्यमांमधील महिलांच्या सकारात्मक आणि सन्माननीय प्रतिमेचे समर्थन करणे; निरोगी आणि सामान्य म्हणून महिलांच्या शरीराच्या विविध श्रेणींचे समर्थन.विविध माध्यमांमधील लैंगिकतेकडे लक्ष देणे आणि स्त्रियांचे नकारात्मक चित्रण दूर करण्यासाठी सक्रियपणे कार्य करणे. जाहिरातींमध्ये महिलांचे शारिरीक प्रदर्शन आणि शोषण सोडविण्याच्या द्रुष्टीने प्रशिक्षण कार्यक्रमांना प्रोत्साहन.महिला आणि प्रसार माध्यमे-प्रसार माध्यमांमध्ये महिलांचे सकारात्मक प्रतिनिधित्व करण्यासाठीच्या नियमांचे अन्वेषण. लोकशाही समाजात पुरुष आणि स्त्रियांमधील समानतेच्या महत्त्वा विषयीची, जी पुरुष आणि स्त्रियांच्या प्रचलित नकारात्मक रूढींना संबोधित करेल अशी मोहीम विकसित करणे.

**महिला सक्षमीकरण व लिंग समानता म्हणजे काय ?**

महिला सक्षमीकरण म्हणजे व्यापक अर्थाने, ज्या प्रक्रियेद्वारे महिला स्वतःच्या जीवनावर सत्ता आणि नियंत्रण मिळवतात आणि धोरणात्मक निवडी करण्याची क्षमता प्राप्त करतात.यामध्ये महिलांमध्ये आत्म-मूल्याची भावना निर्माण करणे, त्यांच्या स्वतःच्या निवडी ठरवण्याची क्षमता आणि स्वतःसाठी आणि इतरांसाठी सामाजिक बदलांवर प्रभाव पाडण्याचा त्यांचा अधिकार यांचा समावेश आहे.

लिंग समानता म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या महिला संघटनेनुसार,लिंग समानता म्हणजे महिला आणि पुरुष, मुली आणि मुलांचे समान हक्क, जबाबदाऱ्या आणि संधी.लिंग समानतेचा अर्थ असा नाही की महिला आणि पुरुष समान होतील. उलट, ते पुरुष आणि महिलांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि संधी त्यांच्या लिंगावर अवलंबून

राहणार नाहीत अशी अट घालून लिंग असमानता दूर करण्याचा प्रयत्न करते.लिंग समानता हा मानवी हक्कांचा मुद्दा आणि शाश्वत लोक-केंद्रित विकासाची पूर्वअट आणि सूचक म्हणून मानला जातो.

**महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता यांच्यातील संबंध :**

महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता या संकल्पना एकमेकांशी जोडल्या गेलेल्या आहेत आणि एकमेकांशी गुंतलेल्या आहेत. महिला सक्षमीकरणासाठी लिंग समानतेचा प्रचार ही पहिली आणि सर्वात महत्वाची अट आहे. त्याच वेळी, लिंग समानतेचा पाठपुरावा करणे हे स्वाभाविकपणे महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.

अशाप्रकारे, महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता एकमेकांना चालना देतात आणि एकमेकांची आवश्यकता देखील पूर्ण करतात.

**भारतातील लिंग असमानता व महत्त्वाची आकडेवारी :**

विरोधाभास म्हणजे, आपल्या भारतीय समाजात जिथे महिला देवतांची पूजा केली जाते, तिथे महिलांशी भेदभाव केला जातो आणि त्यांना समान संधी नाकारली जाते. भारतातील लिंग विषमता किंवा लिंग असमानतेची सध्याची स्थिती खालील आकडेवारीवरून दिसून येते.एकूण लिंगभेद : २०२३ च्या लिंगभेद अहवालानुसार, लिंगभेद समानतेच्या बाबतीत भारत १४६ देशांपैकी १२७ व्या क्रमांकावर आहे. सामाजिक-सांस्कृतिक विषमता लिंग गुणोत्तर : राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (२०१९-२१) नुसार, भारतातील एकूण लिंग गुणोत्तर दर १००० पुरुषांमागे १०२० महिला आहे. तथापि, जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर ९२९ इतके कमी राहिले आहे, जे जन्माच्या वेळी सतत लिंग निवड दर्शवते.माता मृत्युदर (एमएमआर) : भारताच्या रजिस्ट्रार जनरलने प्रसिद्ध केलेल्या एमएमआर वरील विशेष बुलेटिननुसार, २०१८-२० या कालावधीत भारतातील एमएमआर दर लाख जिवंत जन्मांमागे ९७ आहे.कुपोषण : एनएफएचएस-५ नुसार, १५-४९ वयोगटातील १८.७% महिला कमी वजनाच्या आहेत, १५-४९ वयोगटातील २१.२% महिलांची वाढ खुंटलेली आहे आणि १५-४९ वयोगटातील जवळजवळ ५३% महिलांना रक्तक्षय आहे.शिक्षण : NFHS-5 (२०१९-२१) नुसार, महिलांमध्ये साक्षरता दर ७०.३% आहे तर पुरुषांमध्ये हा दर ८४.७% आहे.

लिंग-आधारित हिंसाचार :एनसीआरबीच्या "भारतातील गुन्हे" २०२१ च्या अहवालानुसार, २०२१ मध्ये महिलांवरील गुन्ह्यांची ४ लाखांहून अधिक प्रकरणे नोंदवण्यात आली. ही आकडेवारी केवळ नोंदवलेल्या घटना दर्शवत असल्याने, प्रत्यक्ष आकडेवारी खूपच जास्त आहे.बालविवाह : NFHS-5 नुसार, २०-२४ वर्षे वयोगटातील २३.३% महिला १८ वर्षांच्या आधी विवाहित होत्या किंवा विवाहित होत्या.

**भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता :**

नेक्स्ट आयएएस टीमने २४ नोव्हेंबर २०२४ रोजी सांगितल्याप्रमाणे १०३५६९ महिला सक्षमीकरण भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेचा मार्ग हा लवचिकता, संघर्ष आणि आशेचा प्रवास आहे. लिंग असमानता दूर करण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी झाली असली तरी, खोलवर रुजलेली पितृसत्ता नष्ट करून

खऱ्या अर्थाने भारतात महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता साध्य करण्याचा प्रवास अजूनही कठीण आहे. हा लेख भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेच्या बहुआयामी पैलूंचा आढावा घेतो, भारतातील महिला सक्षमीकरण कार्यक्रम, केलेली प्रगती, अजूनही राहिलेले अडथळे आणि लिंग-समान भारत निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेली पावले यावर प्रकाश टाकतो.लिंग समानता हा मानवी हक्कांचा मुद्दा आणि शाश्वत लोक-केंद्रित विकासाची पूर्वअट आणि सूचक म्हणून मानला जातो.लिंग समानता भारतातील महिला सक्षमीकरण भारतातील महिला सक्षमीकरण समाजात समानता आणि प्रतिष्ठा सुनिश्चित करण्यासाठी महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दर्जा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करते. शिक्षण, आरोग्यसेवा आणि आर्थिक स्वातंत्र्याला प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांमध्ये लिंग-आधारित हिंसाचार, कामाच्या ठिकाणी भेदभाव आणि असमानता यांना संबोधित करणारे कायदे यांचा समावेश आहे.बेटी बचाओ, बेटी पढाओ, बचत गट आणि आरक्षण धोरणे यासारख्या उपक्रमांचा उद्देश महिलांना सक्षम बनवणे आणि त्यांना देशाच्या विकासात योगदान देण्यास सक्षम करणे आहे.प्रगती असूनही, पितृसत्ताकता, निरक्षरता आणि सुरक्षिततेच्या चिंता यासारख्या आव्हाने कायम आहेत, ज्यामुळे खऱ्या लिंग समानतेसाठी सतत प्रयत्नांची आवश्यकता आहे.गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महिलांच्या सामूहिक एकत्रीकरण आणि सहभागावर विशेष भर दिला. त्यांनी महिलांना राजकीय स्वातंत्र्यासाठी तसेच त्यांच्या सामाजिक आणि राजकीय हक्कांसाठी लढण्यास प्रोत्साहित केले.राष्ट्रीय चळवळींमध्ये महिलांचा हा सहभाग थेट पुरुषप्रधान समाजाला प्रश्न विचारण्यासाठी नव्हता, परंतु त्यामुळे भारतात लिंग समानता आणि महिला सक्षमीकरणाला चालना देण्याच्या कार्याला मदत झाली. महिलांमध्ये आत्मविश्वासाची भावना आणि त्यांच्या शक्तीची जाणीव निर्माण करणे.जुन्या परंपरा आणि रीतिरिवाजांचे अनेक अडथळे तोडून टाकणे. अलिकडच्या काळात, लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यावर पुन्हा एकदा लक्ष केंद्रित करून, सरकारने भारतात अनेक महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरू केले आहेत.

जरी त्यांच्या परिस्थितीत काही सुधारणा झाल्या असल्या तरी, भारतातील महिलांशी भेदभाव केला जात आहे आणि त्यांना समान संधी नाकारल्या जात आहेत.सद्य परिस्थिती आणि त्याबाबत घेतलेल्या प्रयत्नांचा तपशीलवार आढावा पुढील भागात सादर केला आहे.भारतात पितृसत्ताक मानसिकता आणि लिंग असमानता कायम असल्याने, महिलांना परस्परविरोधी भूमिका स्वीकारण्यास भाग पाडले जाते. मुली, माता,पत्नी आणि सुना या त्यांच्या पारंपारिक पालनपोषणाच्या भूमिका महिला प्रभावीपणे पार पाडतील याची खात्री करण्यासाठी स्त्रीची ताकद जागृत केली जाते. दुसरीकडे "कमकुवत आणि असहाय्य स्त्री" ही रूढी त्यांच्या पुरुष समकक्षांवर पूर्णपणे अवलंबून राहण्यासाठी जोपासली जाते.

**निष्कर्ष :**

लिंगभेदाच्या समस्येमुळे स्त्रियांना आपलं स्वातंत्र्य पूर्णता उपभोक्ता येत नाही.भारतासह संपूर्ण जगातच पुरुषप्रधान संस्कृती असल्याने महिला मात्र तुलनेने मागे राहिलेल्या दिसतात. चूल आणि मूल हे तर भारतातील संस्कृतीचाच भाग झालेला आहे परंतु आधुनिक काळात मात्र या परिस्थितीत बदल होतांना दिसते.भारताला विकसित देश म्हणून जगात नाव रूपाने यायचे असल्यास स्त्रियांना देखील मोठ्या प्रमाणात विकासाच्या

प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून त्यांच्या शक्तीचा वापर करून व त्यांना त्यांचे अधिकार देऊन त्यांना पूर्ण स्वतंत्रता प्रधान करणे हेच खरे महिला सबलीकरण आहे.भारतीय स्त्रीला लिंगभेदाच्या खाईतून बाहेर काढून महिला सबलीकरणावर विशेष भर देणे आवश्यक आहे.आज संपूर्ण जगात खास करून विकसित देशात मोठ्या प्रमाणात स्त्रीशक्ती समोर येत आहे म्हणून भारतात देखील स्त्रियांनी विकासाच्या या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपले अस्तित्व निर्माण करून आपल्या अधिकारांना प्राप्त करून आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन या सर्व बाबी घडवून आणणे व त्याच्या माध्यमातून स्वतःचा विकास करणे हेच ध्येय ठेवले पाहिजे. अध्ययनाद्वारे प्राप्त परिणामांवरून निदर्शनास येते की प्रस्तुत शोधनिबंधाकरिता घेण्यात आलेली सर्व गृहीते अनुकूल सिद्ध झाली आहेत त्यामुळे या सर्व गृहीतकांचा स्वीकार करण्यात आला आहे.

**संदर्भ सूची :**


- डॉ. जयश्री गोंडसे "स्त्री अभ्यास विविध पैलू" कीर्ती प्रकाशन छ.संभाजीनगर-2012.
- महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती-महिला आयोग अहवाल, 1997.
- उमा वडसे -"भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान".
- सुचिता पडळकर - "शिक्षण प्रवाहाच्या उपमापाशी" मनोविकास प्रकाशन पुणे.
- अनुसया लिमये-'स्त्रीचे समाजातील स्थान व भूमिका" विश्वकर्मा मुद्रानालय पुणे.
- स्मिता मेहत्रे-(जुलै 2011) "भारतीय स्त्री आणि मानवाधिकार" -श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
- डॉ.प्रदिप आगलावे - संशोधन पद्धती,विद्या प्रकाशन-नागपूर. (२००८)
- डॉ.सुधाकर शास्त्री-भारतीय अर्थव्यवस्था-विश्व पब्लिशर्स कंपनी,
- डॉ.पु.ल. भांडारकर -सामाजिक संशोधन पद्धती,जानेवारी - १९८१.
- मिश्र-पुरी -भारतीय अर्थव्यवस्था (२०११) हिमालय प्रकाशन,दिल्ली.